
MyCARE

With me, every step of the way



“साइट रोटेशन (इंजेक्शनची जागा बदलणे) याचे महत्त्व लक्षात घेता, **आपण ’लायपोहायपरट्रॉफी’ म्हणजे काय** आणि तुम्ही ते कसे शोधून काढू शकता **हे समजून घेऊ या.**”


**लायपोहायपरट्रॉफी (एलआयपीओ)** म्हणजे त्वचेच्या पृष्ठभागाच्या खाली लागूनच **असाधारण प्रमाणात चरबी** साठणे. यामुळे त्वचा तुमच्या शरीरावरील इतर ठिकाणच्या त्वचेच्या तुलनेत खडबडीत व घट्ट असलेली जाणवेल, जर एखाद्या विशिष्ट कालावधीत त्वचेवर अनेक इंजेक्शन्स साधारणपणे एकाच जागेवर दिली गेली तर हे घडू शकते.




टीप : लायपो साइटस म्हणजेच लायपो जेथे आहे अशा जागेमधील वेदना जाणवणे कमी होते, हे एक निदर्शक असू शकते.

**लायपोजमुळे इन्शुलिनचे काम योग्य रीतीने होण्यात अडथळा येतो.**

जेव्हा त्वचा खडबडीत होते आणि इन्शुलिन अशा खडबडीत जागी दिले जाते तेव्हा **ते नीट एकसमान पद्धतीने शोषिले जात नाही.**



याचाच अर्थ असा की
**इन्शुलिन शोषले जाण्यासाठी जास्त वेळ लागतो,** त्यामुळे रक्त शर्करा पातळ्या वाढतात किंवा ते खूपच वेगाने शोषले जाऊ शकते व त्यामुळे हायपोग्लायसेमिया होऊ शकतो.




इंजेक्शनच्या जागेची नियमितपणे तपासणी करून **लायपो निर्माण होत आहेत का हे पाहणे महत्त्वाचे असते**




# लायपोचा तपास कसा करवा ?

जेथे तुम्ही इंजेक्शन देणार आहात त्या जागेभोवती जर कोणतेही **आवळणारे कपडे असतील तर ते दूर करावेत.**




**तुम्ही स्वत:कडे** संपूर्ण उंचीच्या आरशात पहा.



**इंजेक्शनच्या जागेच्या भोवतीच्या भागात दोन बोटे ठेवा.** गोलाकार बोटे फिरवीत, खालच्या दिशेने दाबा किंवा चरबीच्या थरात खोलवर दाबा.




जर तुम्ही तपासणी करत असलेल्या भागावर जेल किंवा मॉइश्चरायझर लावलेत **तर तुम्हाला सहजपणे तपासणी करता येईल** व ते अधिक सुखकर असेल




टीप: तुम्ही ही तपासणी आंघोळ करत असताना साबण लावलेल्या त्वचेवरही करू शकता.

जर तेथे कोणतेही लायपो नसेल आणि जर तो टिश्यू निरोगी असेल तर, **तुमची बोटे मऊ चरबीच्या टिश्यूवरून सहजपणे फिरतील.**




जर तेथे लायपोज असतील तर

**तुमच्या बोटाला काहीतरी कडक जाणवेल/ रबरासारख्या टिश्यूकडून प्रतिरोध होताना जाणवेल.**




# लायपोहायपरट्रॉफीला प्रतिबंध करणे


**एकाच ठिकाणी वारंवार इंजेक्शन देऊ नका** आणि साइट रोटेशनचा म्हणजेच जागा वारंवार बदलण्याचा नियम पाळा. **शेवटचे इंजेक्शन जेथे दिले होते त्या जागेपासून एका बोटाच्या अंतरावर पुढचे इंजेक्शन द्या.**



एक सुई एकदाच वापरण्याचा **नियम पाळा**




**इंजेक्शन दिलेल्या जागेची** नियमितपणे तपासणी करून तेथे गुठळ्या निर्माण झाल्या आहेत का ते पहा



# जर लायपोहायपरट्रॉफी असेल तर काय करावे ?

**संपूर्णपणे बरी होईपर्यंत त्याच जागेवर इंजेक्शन देऊ नका.** यासाठी 2-3 महिने लागू शकतात.



जर तुम्ही इंजेक्शन घेत असताना **तुम्हाला इंजेक्शनच्या जागेवर गुठळ्या, खडबडीतपणा किंवा सूज आल्याचे जाणवले** तर ताबडतोब तुमच्या डॉक्टरांना किंवा **MyCARE** डायबेटीस एज्युकेटरना कळवा.



“अधिक माहितीसाठी तुमच्या डॉक्टरांशी किंवा तुमच्या **MyCARE डायबेटिस एज्युकेटरशी** संपर्क साधा.”



MyCARE

With me, every step of the way

## Reference


1. Gentile, S., Guarino, G., Giancaterini, A., Guida, P., Strollo, F., & AMD-OSDI Italian Injection Technique Study Group (2016). A suitable palpation technique allows to identify skin lipohypertrophic lesions in Insulin-treated people with Diabetes. SpringerPlus, 5, 563. https://doi.org/10.1186/s40064-016-1978-y

2. Diabetes.co.uk . Lipohypertrophy – Injections and Lumpy Skin (2019). Available at https://www.Diabetes.co.uk/conditions/lipohypertrophy.html

3. Tandon N, Kalra S, Balhara YPS, et al. Forum for Injection Technique and Therapy Expert Recommendations, India: The Indian Recommendations for Best Practice in Insulin Injection Technique, 2017. Indian J Endocrinol Metab. 2017;21(4):600-617. doi:10.4103/ijem.IJEM_97_17


Issued in Public Interest by USV

The guide/presentation/content/literature is for general information, guidance and educational purposes only and is not complete or exhaustive. The guide /presentation/content/literature is not intended or implied to replace or substitute any current practice and or advice/guidance/diet provided by healthcare professionals. This guide/presentation/content/literature does not constitute any treatment/therapy/medication/diet/opinions for any patients who are on diabetes medication, the patients are required to prior consult their healthcare professional before acting on any change on treatment/therapy/ medication/diet and/or opinions. USV Private Limited makes no representations as to accuracy, completeness, correctness, suitability or validity of any information contained in this guide/presentation/content/ literature and will not be liable for any losses, injuries or damages arising from its use.